# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


---

**महत्वाचे परिपत्रक :**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/2845
दिनांक : 09 JUL 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित /
विनाअनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.
(पुणे विभागे)

विषय :- ३३ कोटी वृक्ष लागवड
**वृक्ष लागवड करुन, त्याबाबतची माहिती ऑनलाईन पध्दतीने अपलोड करण्याबाबत.**
संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.तंशिविकापु/कवकव/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/२६८१,
दि. २८.०६.२०१९

उपरोक्त विषयान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर जिल्हयातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व संस्थांप्रमुखांना या परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात येते की, सन २०१९ पावसाळा ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत रोज लागवड दिनांक ०१.०७.२०१९ पासून सुरु झाली आहे, त्या अनुषंगाने आपल्या संस्थेस प्राप्त उदिष्टानुसार रोप लागवडीची सुरुवात करण्यात यावी.

रोपे पुरवठा करणेबाबत उप वनसंरक्षक वन विभाग यांचे कार्यालय तसेच तालुकास्तरीय वनक्षेत्रपाल यांना सूचित करण्यात आले असून, त्यांचेशी संपर्क साधून रोपे उपलब्ध करुन घ्यावीत. तसेच दररोज होणा-या **वृक्षलागवडीची माहिती रोजच्या रोज ऑनलाईन पध्दतीने <u>www.mahaforest.gov.in</u>** या संकेतस्थळावर **अपलोड करुन, Geotag Photo व Video अपलोड करावेत.** तसेच याबाबत काही अडचण असल्यास, आपल्या जिल्हयातील वन विभागाच्या जिल्हा तसेच तालुका स्तरीय कार्यालयांशी संपर्क साधण्यात यावा. ज्या संस्थांनी अद्याप रोपे लावण्याबाबतची कार्यवाही केली नसेल, त्यांनी वृक्षलागवडीबाबत त्वरीत कार्यवाही करुन, त्याबाबतची माहिती ऑनलाईन पध्दतीने अपलोड करावी.. **याबाबत लवकरच जिल्हानिहाय व संस्थानिहाय आढावा घेण्यात येणार आहे.**

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.